**puisne judge,** मुख्येतर न्यायाधीश (सा.)
**puisne mortgage,** अनुवर्ती गहाण (न.) [C.P.C.-Order XXXIV-Rule 1 Expl.]
**punish,** *v.t.* शिक्षा देणे, शिक्षा करणे
**punishable,** *adj.* शिक्षापात्र, शिक्षायोग्य, दंडाई
**punishment,** *n.* शिक्षा (स्त्री.), दंड (पु.)
**punitive=punitory,** *adj.* शिक्षात्मक
**punitive cost,** शिक्षावजा परिव्यय (पु.) [C. P.C.-s. 35 A]
**punitive damages,** शिक्षावजा नुकसान भरपाई (स्त्री.)
**purchasable,** *adj.* खरेदीयोग्य
**purchase,** *v t. & i.* खरीदणे, खरेदी करणे, क्रय करणे
*n.* खरेदी (स्त्री.), क्रय (पु.)
**purchase money,** खरेदीची रक्कम (स्त्री.) [T. P. Act-s. 37-ill.(9)]
**purchase price,** खरेदी किंमत (स्त्री.), क्रय मूल्य (न.)
**purchaser,** *n.* क्रेता (सा.), खरेदीदार (सा.)
**purchaser for value,** (an indorsee of a negotiable instrument who take it before maturity in part payment of a pre-existing debt and credits it thereon) मूल्यार्थ क्रेता (सा.)
**purchaser's title,** खरेदीदाराचा हक्क (पु.) [C. P. C.-s. 65-m.n.]
**purport,** *v.t.* 1. अभिप्रेत असणे, आशय असणे 2. दिसणे, भासणे
*n.* 1. अभिप्राय (पु.), आशय (पु.) 2. तात्पर्य (न.)
**purported marriage,** भासमान विवाह (पु.) [Matrim. Caus. Act-s. 12(b)]
**purporting,** *adj.* 1. अभिप्रेत असताना 2. भासणारा [Nego. Inst. Act-s. 42]
**purporting to act,** तसे अभिप्रेत असताना कार्य करणारा
**purporting to be,** तसा दिसणारा [Ind. Evi. Act-s. 79]
**purpose,** *n.* 1. प्रयोजन (न.) 2. हेतु (पु.), उद्देश (पु.)
**purposeful,** *adj.* 1. प्रयोजनपूर्वक 2. सहेतुक
**purposefully,** *adv.* हेतुपूर्वक, हेतुपुरस्सर
**purposely,** *adv.* प्रयोजनपूर्वक, हेतुपुरस्सर
**purposes of justice,** न्यायाची प्रयोजने (न. अ. व.)
**purposive grant,** प्रयोजनविशिष्ट अनुदान (न.)
**purse,** *n.* 1. तनखा (पु.) 2. अधिमूल्य (न.) 3. पैसे (पु.अ.व.)
**purser of a ship,** पोतनीस (पु.) [Ind. Suc. Act-s. 65-ill. (ii)]
**pursue,** *v.t.* (as, trade etc.) अनुसरणे [Hin. Gains of Learn. Act-s. 2(c)]
**pursuit,** *n.* 1. पाठलाग (पु.) 2. व्यवसाय (पु.)
**purveyance,** *n.* राजक्रयाधिकार (पु.)
**purview,** *n.* 1. (body of a statute as distinguished from preamble) संविधिकाय (पु.) 2. (scope, intention or range as of a statute, document, scheme etc.) कक्षा (स्त्री.), दृष्टिक्षेत्र (न.), आवाका (पु.)
**putative,** *adj.* ख्यात, तथाकथित
**putative father,** (in bastardy proceeding, the sworn father) तथाकथित पिता (पु.), तथाकथित बाप (पु.)
**putative marriage,** (a marriage which is in reality null, but which is contracted in good faith by the two parties or by one of them) तथाकथित विवाह (पु.)
**putative matrimony,** तथाकथित विवाहसंबंध (पु.)
**put up,** 1. राहणे 2. प्रस्तुत करणे 3. मांडणे

# Q

**qualification,** *n.* 1. अर्हता (स्त्री.) 2. मर्यादा (स्त्री.) 3. विशेष (पु.)
**qualified,** *adj.* 1. अर्हताप्राप्त 2. मर्यादित केलेला 3. सोपाधिक 4. विशेषित
**qualified acceptance,** विशेषित स्वीकार (पु.) [Nego. Inst. Act-s. 86-m.n.]
**qualified endorsement,** (endorsement without recourse to the endorser for payment) विशेषित पृष्ठांकन (न.)
**qualified fee-simple,** सोपाधिक दाय (पु.)
**qualified medical man,** अर्हताप्राप्त वैद्यकीय तज्ञ (सा.) [Cr. P. C.-s. 174(3)]
**qualified medical practitioner,** अर्हताप्राप्त वैद्यकव्यवसायी (सा.)
**qualified ownership,** सोपाधिक स्वामित्व (न.)
**qualified privilege,** सोपाधिक विशेषाधिकार (पु.)
**qualified title,** सोपाधिक हक्क (पु.)
**qualify,** *v.t. & i.* 1. अर्ह असणे, अर्हता प्राप्त करून देणे 2. मर्यादित करणे 3. विशेषित करणे
**qualifying terms,** विशेषक शब्द (पु. अ. व.) [Ind. Suc. Act-s. 93]
**qualitative,** *adj.* गुणात्मक, गुणविशिष्ट
**quality,** *n.* 1. दर्जा (पु.), प्रत (स्त्री.) [Sale of Gds. Act-s. 2(12)] 2. योग्यता (स्त्री.) [Ind. Suc. Act-s. 320] 3. गुण (पु.), गुणवत्ता (स्त्री.)
**quality control,** गुणवत्ता नियंत्रण (न.), प्रत नियंत्रण (न.)
**quality marking,** गुणांकन (न.)
**quality of goods,** मालाची प्रत (स्त्री.)
**quantitative,** *adj.* परिमाणात्मक, परिमाणविशिष्ट
**quantity,** *n.* प्रमाण (न.), राशी (स्त्री.), परिमाण (न.) [Sale of Gds. Act-s. 37-m.n.]
**quantum,** *n.* प्रमात्रा (स्त्री.), ठरीव प्रमाण (न.)
**quarantine,** *n.* 1. (isolation or detention imposed on voyagers, travellers etc. to prevent spread of contagion or infection) पृथक्‌वास (पु.) 2. संसर्गरोधशाला (स्त्री.)
**quarry,** *n.* दगडखाण (स्त्री.) [T. P. Act-s. 108 (o)]
*v.t.* खाणीतून काढणे
**quarter in a year,** वर्षातील तिमाही (स्त्री.) [Ind. Christ. Mar. Act-s. 81]
**quarterly,** *adv.* दर तिमाहीस [Ind. Suc. Act-s. 339]
*adj.* त्रैमासिक
**quarterly return,** त्रैमासिक विवरण (न.) [Ind. Christ. Mar. Act-s. 29-m.n.]
**quash,** *v.t.* (to abate, annul etc.) रद्दबातल करणे
**quasi,** (used in comb.)-वत, जणू काय,-कल्प, -सदृश
**quasi-contract,** *n.* संविदाकल्प (पु.)
**quasi-corporation,** *n.* निगमकल्प (पु.)
**quasi-criminal,** *adj.* गुन्हासदृश
**quasi-delict,** *n.* दुष्कृतिकल्प (पु.)
**quasi-derelict,** *adj.* त्यक्तवत
**quasi-estopoel,** *n.* प्रतिष्टंभ-कल्प (पु.)
**quasi-government,** *n.* शासनकल्प (पु.)
**quasi-judicial,** *adj.* न्यायिकवत [C. P. C.-s. 128 (2)(i)]